सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# गृहनिर्माण विभाग

## मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०००३२.

# नागरिकांची सनद

संकेतस्थळ: www.housing.maharashtra.gov.in

www.maharashtra.gov.in

गृहनिर्माण विभाग

# गृहनिर्माण विभाग (खुद्द)

# मंत्रालय

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे
विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना
होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
मधील कलम ८ नुसार

# नागरिकांची सनद

गृहनिर्माण विभाग

# <u>गृहनिर्माण विभाग</u>

## महाराष्ट्र शासन

## नागरिकांची सनद

### <u>इतिहास</u>

महाराष्ट्र राज्याची स्थापना दिनांक १ मे १९६० रोजी झाली असून, राज्यामधील गृहनिर्माण योजना व झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रमासाठी दिनांक **२७ ऑक्टोबर १९८०** च्या परिपत्रकान्वये तत्कालीन सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे विभाजन करून गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर त्यातील विशेष सहाय्य विभाग दिनांक **१ मे २००१** रोजी सामाजिक न्याय विभागास जोडण्यात आला.

### <u>प्रस्तावना</u>

सन २०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ९.२९% लोकसंख्या महाराष्ट्र राज्यात असून सद्या महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या १२,९८,७७,५४१ आहे व जवळपास ४२% लोकसंख्या ही नागरी भागात आहे. नागरीकरण होत असलेल्या देशात निवारा ही एक आव्हानात्मक बाब आहे. महाराष्ट्र हे देशातील झपाट्याने नागरीकरण होत असलेले राज्य आहे. नागरी विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून घरबांधणी कार्यक्रमाला विशिष्ट महत्त्व आहे.

निवारा ही मानवाची एक मूलभूत गरज आहे. ही बाब विचारात घेऊन राज्याच्या ग्रामीण व शहरी भागातील सर्व स्तरातील लोकांसाठी म्हणजेच अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट या सर्वांना परवडणाऱ्या टिकाऊ घरांची निर्मिती करण्यासाठी व चालना देण्यासाठी शासनाकडून विविध योजना राविबवल्या जातात. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण योजना, विविध स्वरूपाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनादेखील या विभागाकडून राबविल्या जातात.

विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना, सर्व सामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करुन देण्यासाठी शहरी भागात प्रधानमंत्री आवास योजना या सारख्या योजना व गृहनिर्माण धोरणांशी संबंधित विषयक कामे या विभागाकडून पार पाडली जातात.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ च्या कलम ८३(१) अन्वये मुख्यत: बृहन्मुंबई बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीची दुरुस्ती व पुनर्रचना, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात येते.

गृहनिर्माण विभागाच्या नियंत्रणाखाली घरबांधणीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ही स्वायत्त संस्था तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही प्राधिकरणे कार्यरत आहेत. तसेच, झोपडपट्टी पुनर्विकास योजनांसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी पारित केलेल्या आदेशाविरुद्धच्या तक्रारींचे निवारण होण्यासाठी शिखर तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर क्षेत्रातील शासकीय गलिच्छ वस्ती घोषित जमिनीवर अतिक्रमणे होऊ नयेत याकरिता अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पूर्व उपनगरे व अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पश्चिम उपनगरे व संबंधित सक्षम प्राधिकारी या कार्यालयांद्वारे कार्यवाही करण्यात येते.

बृहन्मुंबई सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई अपील अधिकारी आणि महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ मधील कलम २२, २३ व २४ नुसार त्या विवक्षित क्षेत्रातील प्रकरणे दाखल करून घेणे व चौकशीअंती निकाली काढणे याकरिता सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा ही कार्यालये कार्यरत आहेत.

स्थावर संपदा क्षेत्रात ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी व त्यांच्या हिताचे व हक्काचे संरक्षण व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाने स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा, २०१६ (**रेरा**) दि.२५.०३.२०१६ रोजी देशभरात लागू केला. त्याअनुषंगाने, दि.०१.०५.२०१७ पासून महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणांची (**महारेरा**) स्थापना करण्यात आली. तसेच, महारेरा कार्यालयाने दिलेल्या निर्णय, निर्देश किंवा आदेश तक्रारदारास मान्य नसल्यास त्या विरुध्द दाद

मागण्यासाठी दि. २४.१२.२०१८ रोजी महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरणाची देखील स्थापना करण्यात आली आहे.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या कार्यालयाकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात येते. प्रकल्पबाधितांसाठी जमीन उपलब्ध झालेल्या ठिकाणी पुनर्वसन सदनिका बांधणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व अल्प उत्पन्न (LIG) घटकासाठी (जमीन उपलब्ध झाल्यास) सदनिका बांधणे यासाठी खाजगी क्षेत्रातील व्यावसायिकांना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे तसेच मालकी हक्काच्या सदनिका, कार्यालये, औद्योगिक आणि वाणिज्यिक आस्थापना बांधण्यासाठी “विकासक” आणि “कंत्राटदार” म्हणून काम करणे” इ. कामकाजही शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादीत यांच्याकडून हाताळले जाते.

महाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी गृहनिर्माण विभागाची माहिती, या विभागांतर्गत उपलब्ध सेवांचा तपशील व त्यावर करण्यात येणारी अंमलबजावणी याबाबतची माहिती दर्शविणारी सोबतची नागरिकांची सनद (Citizen's Charter) तयार करण्यात आली आहे.

या सनदेमुळे जनतेला या विभागाकडून मिळणाऱ्या सेवा तसेच, कायद्याची आणि या विभागाचे नियम / अधिनियमांची माहिती मिळण्याची खात्री देता येईल.

वल्सा नायर सिंह

ठिकाण : मंत्रालय, मुंबई.
दिनांक : १५ डिसेंबर, २०२२.

(वल्सा नायर सिंह)
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
महाराष्ट्र शासन.

गृहनिर्माण विभाग

# गृहनिर्माण  विभागाच्या अधिपत्याखालील प्राधिकरणे/महामंडळ/कार्यालये

| | |
|---|---|
| महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण<br><br>(म्हाडा प्राधिकरणांची नागरिकांची सनद स्वतंत्ररित्या https://www.mhada.gov.in/ वर प्रसिध्द करण्यात आली आहे.) | |
| झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>(झोपडपट्टी प्राधिकरणांची नागरिकांची सनद स्वतंत्ररित्या https://sra.gov.in/ वर प्रसिध्द करण्यात आली आहे.) | |
| महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ (महा हाऊसींग) | |
| महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) | |
| महाराष्ट्र स्थावर संपदा अपीलीय न्यायाधीकरण | |
| मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ | |
| महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा न्यायालय | |
| महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सु.नि.व  पु.) न्यायाधिकरण | |

## मंत्रालय (खुद्द) येथील गृहनिर्माण विभागाची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

| | |
|---|---|
| शासकीय मंत्रालयीन विभागाचे नाव | गृहनिर्माण विभाग |
| पत्ता | गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.<br>कार्यालय प्रमुख-अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण). |
| कार्यक्षेत्र | महाराष्ट्र राज्य. |
| विभागास नेमून दिलेले विषय (कार्य) | महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीतील क्रमांक १७ नुसार गृहनिर्माण विभागास नेमून दिलेले विषय. |
| विभागाचे ध्येय / धोरण | गृहनिर्माण धोरण ठरविणे व ते विभागाच्या अधिनस्त यंत्रणांमार्फत राबविणे. |
| एकूण मंजूर पदे (अधिकारी व कर्मचारी) | १२१ |
| एकूण कार्यरत पदे (अधिकारी व कर्मचारी) | ७३ |
| कामाचे विस्तृत स्वरूप | गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी करणे. |
| उपलब्ध सेवा :- | गृहनिर्माण विभागाच्या संकेतस्थळावर विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रके यात नमूद केल्याप्रमाणे. |
| विभागाच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील. | सोबत जोडले आहे. |
| कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळा | ०२२-२२८२१९६९, ०२२- २२७९३४२५<br>ईमेल-:<br>psec.housing@maharashtra.gov.in<br>वेळ :- सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ |
| साप्ताहिक सुट्टी :- | शनिवार व रविवार |

## मंत्रालय येथील गृहनिर्माण विभागातील उपलब्ध सुविधांचा तक्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| ➢ | भेटण्याच्या वेळे संदर्भात माहिती | - | अपर मुख्य सचिव - सायं - ४.०० ते ६.००<br>उप सचिव, अवर सचिव - दु. - २.०० ते ६.०० |
| ➢ | वेबसाईट विषयी माहिती | | www.housing.maharashtra.gov.in<br>www.maharashtra.gov.in |
| ➢ | अभिलेख तपासणी उपलब्ध सुविधांची माहिती | | माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकाऱ्यामार्फत अभिलेख उपलब्ध करुन दिले जातात. |
| ➢ | माहिती/सूचनाफलक | | • माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (१), ५(२) व १९ नुसार, गृहनिर्माण विभागातील जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांच्या माहितीचा फलक, तिसऱ्या मजल्यावर विस्तार इमारतीकडे जाताना एनआयसी कार्यालयासमोर दर्शनी भिंतीवर दर्शविण्यात आला आहे.<br>• महिला तक्रार निवारण समिती व दिव्यांग व्यक्ती यांच्या करिता तक्रार निवारण अधिकारी याबाबतचा तपशिल दर्शविणारे सूचनाफलक गृहनिर्माण विभाग, ३ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२ येथे दर्शनी भागात लावण्यात आले आहेत. |
| ➢ | विभागाच्या विषयासंबंधीचे कायदे/पुस्तके | | संबधित कार्यासने तसेच प्रशा-१ कार्यासन येथे उपलब्ध आहे. |

गृहनिर्माण विभाग

# अभ्यांगतांना भेटण्याच्या वेळा

| अ. क्र. | सुविधेचा प्रकार | वेळ | कार्यपध्दती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती/ अधिकारी/ कर्मचारी | तक्रार निवारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भेटण्याच्या वेळेसंदर्भात | साय. ४ ते ६ वा. | प्रत्यक्ष भेट | गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२. | अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव/ सचिव गृहनिर्माण विभाग | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव गृहनिर्माण विभाग. |
| २. | वेबसाईट विषयी माहिती | पूर्ण वेळ | विभागाचे संकेतस्थळ | गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२. | उप सचिव, (प्रशा-१) गृहनिर्माण विभाग | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव गृहनिर्माण विभाग. |
| ३. | सूचना फलकाची माहिती | कार्यालयीन वेळ | --- | गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२. | उप सचिव, (प्रशा-१) गृहनिर्माण विभाग | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव गृहनिर्माण विभाग. |

# <u>गृहनिर्माण विभागातील अधिकार श्रेणी दर्शविणारा तक्ता</u>

मा. उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री

↑

अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)

↑

उप सचिव

↑

अवर सचिव

↑

कक्ष अधिकारी

↑

सहायक कक्ष अधिकारी

↑

लिपिक-टंकलेखक

↑

शिपाई

## <u>लघुलेखक संवर्ग</u>

↑

निवडश्रेणी लघुलेखक

↑

उच्चश्रेणी लघुलेखक

↑

निम्नश्रेणी लघुलेखक

↑

लघु-टंकलेखक

गृहनिर्माण विभाग

# गृहनिर्माण विभाग (खुद्द) मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्याचा तपशील

| अ. क्र. | पदनाम | कर्तव्ये | कोणत्या कायदा/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रकानुसार |
|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | विभाग प्रमुख व त्याअनुषंगाने करावयाची सर्व कर्तव्ये. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे. |
| २. | उप सचिव | विभाग प्रमुखांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करतात. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |
| ३. | अवर सचिव | उप सचिव यांना सहाय्य करणे तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यासनांचे पर्यवेक्षण करणे. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |
| ४. | कक्ष अधिकारी | विभागातील कार्यासनाकडे नेमून दिलेल्या विषयाबाबत काम करुन घेण्याची जबाबदारी. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |
| ५. | सहायक कक्ष अधिकारी | कक्ष अधिकारी यांना सहाय्य करणे. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |
| ६. | लघुलेखक संवर्ग | स्वीय सहाय्यकाचे काम करणे, उप सचिव/ अवर सचिव यांना प्राप्त झालेल्या नस्ती व टपालांची आवक-जावक नोंदी ठेवणे, इ. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |
| ७. | लिपिक-टंकलेखक | आवक-जावक नोंदी करणे, नस्त्यांची नोंदणी करणे, इत्यादी. | मंत्रालयीन कार्यनियमावली व कार्यपध्दतीप्रमाणे |

# प्रशासकीय अधिकार

| अ. क्र. | पदनाम | अधिकार-प्रशासकीय | कोणत्या कायदा / नियम/ शासननिर्णय/परिपत्रकानुसार |
|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | शासनाच्या सर्वसाधारण आदेशानुसार व कार्यनियमावलीतील प्राप्त अधिकारानुसार. | शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, अधिनियम, शासन निर्णय, परिपत्रक, कार्यालयीन आदेश, अधिसूचना इ. नुसार देण्यात आलेल्या अधिकारान्वये कार्यालयातील कामकाज चालविले जाते. |
| २. | उप सचिव | १) ई-एचआरएमएस,<br>२) बायोमेट्रिक सिस्टीम,<br>३) महापार,<br>४) डिपार्टमेंटल वेबसाइट,<br>५) ई-ऑफीस ट्रेनिंग,<br>६) माहितीचा अधिकार | कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१३२/प्रशा-१, दि.११.१०.२०२२. |
| ३ | उप सचिव | १)विभागातील केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी.<br>२)आपले सरकार सेवा हक्क कायदा (लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५<br>३) ई-समिक्षा,<br>४) आपले सरकार<br>५) सी.पी. ग्राम (पी.जी.पोर्टल) | कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१३२/प्रशा-१, दि.११.१०.२०२२. |
| ४. | उप सचिव | शासनाचा नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत "नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती यांच्याकरिता तक्रार निवारण अधिकारी" | कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५९/प्रशा-१, दि.०४.११.२०२०. |
| ५. | अवर सचिव (विधी) | विभागातील न्यायालयीन प्रकरणात एकसूत्रता आणणे व समन्वय ठेवणे बाबत. | विधी व न्याय विभागाचा कार्यालयीन आदेश क्र. इएसटी-२०२१/प्र.क्र.७८/ का.२,दि.०१.१०.२०२१. |
| ६. | अवर सचिव (रोखशाखा) | आहरण व संवितरण अधिकारी. | कार्यालयीन आदेश क्र. पदस्था-२०१५/प्र.क्र.२५/प्रशा-१, दि.३०.०७.२०१९. |

# अर्धन्यायीक अधिकार

| अ. क्र. | पदनाम | अधिकार-अर्धन्यायिक | कोणत्या कायदा /नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | भाडे नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत कलम ३(२) नुसार सूट देणे. | भाडे नियंत्रण कायदा, १९९९. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव स्तरावर सुनावणी घेऊन त्यावर मा.मंत्री (गृहनिर्माण) यांची अंतिम मान्यता प्राप्त करून घेणे. |
| २. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, उपकर प्राप्त इमारतीतील भाडेकरु/ रहिवाशी यांच्या पात्रतेविषयी पारित केलेल्या प्रथम अपिल न्यायनिर्णयावर व्यथित झालेल्या अर्जदारांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांवर सुनावणी घेणे. | गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२९/ दुवपू-१, दि.०७/१०/२०१७ रोजीचा शासन निर्णय. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव स्तरावर सुनावणी घेऊन अंतिम निर्णय पारित करण्यात येतात. |
| ३. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव तथा अध्यक्ष शिखर तक्रार निवारण समिती. | मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्दची अपिले, राज्य शासनाच्या आदेशाने सोपविलेली प्रकरणे, मा.उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालय यांनी सोपविलेली प्रकरणे व इतर तक्रार निवारण समितीसमोर सोपविण्यात न आलेल्या विषयांची प्रकरणे शिखर तक्रार निवारण समितीच्या अखत्यारित येतात. | गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्र. झोपसु-१००८/प्र.क्र.१४३(१) /झोपसु-१, दि.०८.०३.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे शिखर तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. | शिखर तक्रार निवारण समितीच्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाविरुध्दच्या अपीलांवर सुनावणी घेऊन अंतिम निर्णय पारित करण्यात येतात. |

## गृहनिर्माण विभागातील निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करून कार्यपद्धतीचे प्रकाशन (कामाचा प्रकार व नाव)

| अ.क्र. | कामाचेस्वरुप | कालावधी/दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | न्यायालयीन प्रकरणे, शासनाची बाजू मांडण्यासाठी न्यायालयात शपथपत्र दाखल करणे व प्रकरणे निकाली काढेपर्यंत पाठपुरावा करणे. | प्रकरण परत्वे वेळेच्यावेळी कार्यवाही करण्यात येत असते. | अवर सचिव (विधी) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, (गृहनिर्माण) यांच्या स्तरावर मान्यता घेतली जाते. |
| २. | आस्थापना विषयक | शासनाच्या आदेशानुसार | अवर सचिव (प्रशा-१), उप सचिव, अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (गृहनिर्माण) यांच्या स्तरावर मान्यता. |
| ३. | अर्थसंकल्पविषयक | शासनाच्या विहित कालमर्यादेनुसार | अवर सचिव (अर्थ/लेखा), उप सचिव, अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (गृहनिर्माण) यांच्या स्तरावर मान्यता. |

# गृहनिर्माण विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा

| अ. क्र. | पुरविली जाणारी सेवा | खालील कालावधीत आवश्यक त्या कार्यवाहीची पूर्तता केली जाते. | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ (१) व कलम ३५ (१) अन्वये अनुक्रमे सक्षम प्राधिकारी व अपिल प्राधिकारी घोषित करणे. | शासनाची मान्यता मिळाल्यानंतर दोन महिन्यांमध्ये आदेश निर्गमित करणे. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव (झोपनि-२) | उप सचिव (झोपनि-२) २२०४१३६५ |
| २. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अन्वये घोषित झोपडपट्ट्यांचे भूसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव आदेशार्थ सादर करणे. | प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्या नंतर २ महिन्यात आदेश निर्गमित करणे. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव (झोपनि-२) | उप सचिव (झोपनि-२) २२०४१३६५. |
| ३. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण उपकर प्राप्त इमारतींना उपकरातून सूट देणे. | प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर १ महिन्यात आदेश निर्गमित करणे. | कक्ष अधिकारी / अवर सचिव (दुवपु-१). | उप सचिव (दुवपु-१) २२०४८३५० |
| ४. | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (प्राधिकरण) म्हाडा अधिनियम, १९७६ मधील प्रकरण ८ (अ) भाडेकरुंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी भूसंपादनाची प्रकरणे व त्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व बाबी व धोरण. | सर्वसाधारण परिस्थितीत न्यायालयाचे प्रतिबंधात्मक आदेश असल्यास कार्यवाहीचा कालावधी अनिश्चित. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव (दुवपू-२) | उप सचिव (दुवपु-२) २२०४८३५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल ) विनियम १९८१ चे विनियम १३(२) खालील विशिष्ट गटासाठी शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. वाटप १२०५/ प्र. क्र. १८० / भाग १ /गृनिभू दि.०८/०२/२००७ अनुसार गृहनिर्माण योजना राबविणे (मुंबई मंडळाच्या अखत्यारितील ) | प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर १५ दिवसांत म्हाडास कळविणे, | कक्ष अधिकारी/ अवर सचिव (गृनिप) | उप सचिव (गृनिप) २२०४८३५० |
| ६. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम १६ अंतर्गत दि.२२.११.२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतुदीनुसार विनियम १६ अंतर्गत भुखंडाचे वितरण आता थेट करता येत नाही. त्यासाठी अशा भुखंडाची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन अर्ज मागविणे, अर्जाची म्हाडाकडून छाननी करणे, शासनास प्रस्ताव सादर करणे व मंत्रिमंडळ उपसमितीने गुणवत्तेनुसार निर्णय घेणे इत्यादी प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. (मुंबई मंडळ वगळून) | शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव/उप सचिव (गृनिभू)<br><br>मुंबई मंडळाच्या अखत्यारितील क्षेत्रासाठी कक्ष अधिकारी/ अवर सचिव/उप सचिव (गृनिप) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव ०२२-२२७९३४२५ |
| ७. | महाराष्ट्र गृह्रनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम-१९८१ चे विनियम १३ (२) अन्वये खालील गटांसाठी गृहनिर्माण | शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव /उप सचिव (गृनिभू) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव ०२२-२२७९३४२५ |



गृहनिर्माण विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | योजनेकरिता शासनाची मान्यता दिली जाते.<br>(१) मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व इतर कनिष्ठ न्यायालयात कार्यरत असलेले न्यायाधीश,<br>(२) आजी/माजी विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभा सदस्य<br>(३) पत्रकार<br>(४) कायम आस्थापनेवर असलेले राज्य व केंद्र शासनाचे अधिकारी / कर्मचारी<br>(५) राज्य शासनास योग्य वाटेल असा इतर कोणताही विशेष प्रवर्ग<br>• या योजनेंतर्गत कोणत्याही विशिष्ट गटासाठी जाहिराती न देता सदनिकांचे वितरण करता येत नाही.<br>• दि. २५.०४.२०११ च्या शासन निर्णयान्वये जाहिरात देणे, नोटीस प्रसिध्द करणे, अर्ज मागविणे, त्यांची छाननी करणे व आवश्यकता असल्यास सोडत काढणे ही प्रक्रिया राबविणे. | | मुंबई मंडळाच्या अखत्यारितील क्षेत्रासाठी कक्ष अधिकारी/ अवर सचिव/उप सचिव (गृनिप) | |
| ८. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास प्राप्त जमिनीचे भूसंपादन रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे. (मुंबई मंडळ वगळून) | शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर. | कक्ष अधिकारी/ अवर सचिव/उप सचिव (गृनिभू) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव |



गृहनिर्माण विभाग

## गृहनिर्माण विभाग शासन आदेश क्रमांक ममाज. २००५/प्र.क्र.१४४/प्रशा-१

## दि. १७ डिसेंबर २००७

## परिशिष्ट-अ

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१), ५ (२) व १९ नुसार, सहायक जन माहिती अधिकारी,जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी

| अ. क्र. | विषय | सहायक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | (अ) प्राधिकरणाच्या योजनांकरिता जमिनी संपादन करणे. | सहायक कक्ष अधिकारी (गृनिभू) २२७९४१२० (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (गृनिभू) २२७९४१२० (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (गृनिभू) २२७९३०४२ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| | ब) प्राधिकरणाचे गाळे वाटप, गाळे वाटपातील आरक्षणे तसेच अनधिकृत ताबा, भाडे दुरुस्ती देखभाल आणि सुखसोयी पुरविण्याबाबत तक्रारी तसेच प्राधिकरणाने विकसित केलेल्या जमिनी व भूखंडाचे विनियम १६ खाली वाटप व त्यानुषंगिक सर्व बाबी (मुंबई मंडळ वगळून). | | | |
| २. | (अ) बी.डी.डी. चाळीच्या संबंधीची धोरणात्मक प्रकरणे. | सहायक कक्ष अधिकारी (गृनिप) २२७९३६९६ (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (गृनिप) २२७९३६९६ (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (गृनिप) २२७९३७९४ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| | (ब) मुंबई शासकीय वास्तू निष्कासन अधिनियम, १९९५ धोरणात्मक बाबी हाताळणे. | | | |
| | (क) मुंबई मंडळाचे गाळे वाटप, गाळे वाटपातील आरक्षणे तसेच अनधिकृत ताबा, भाडे, दुरुस्ती देखभाल आणि सुखसोयी पुरविण्याबाबतच्या तक्रारी तसेच प्राधिकरणाने विकसित केलेल्या जमिनी व भूखंडाचे विनियम १६ खाली वाटप व त्यानुषंगिक सर्व बाबी (फक्त मुंबई मंडळासंबंधातील). | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | गृहनिर्माण विभाग, मंत्रालय (खुद्द) बाबत आस्थापना विषयक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (प्रशा-१) २२७९३८६३ (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (प्रशा-१) २२७९३८६३ (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (प्रशा-१) २२७९३७९४ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| ४. | (अ) गृहनिर्माण विषयक धोरण व गृहनिर्माण या धोरणाबाबत<br>(ब) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ व त्या अंतर्गत धोरणात्मक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (गृनिधो-१) २२७९४१२२ (६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन) | कक्ष अधिकारी (गृनिधो-१) २२७९४१२२ (६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन) | अवर सचिव (गृनिधो-१) २२७९४१२२ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| ५. | रोखशाखा विषयक बाबी | सहायक कक्ष अधिकारी (रोखलेखापाल) (रोखशाखा) (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | ------ | अवर सचिव रोखलेखापाल २२७९३०४४ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) |
| ६. | विभागाशी संबंधित अर्थसंकल्पविषयक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (अर्थ व लेखा) २२७९३०४१ (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (अर्थ व लेखा) २२७९३०४१ (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (अर्थ व लेखा) २२७९३०४२ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| ७. | (अ) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, (www.sppl.biz)<br>(ब) महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ (www.mahahousing.mahaonline.gov.in)<br>(क) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) सदर योजनेसाठी सुकाणु अभिकरण म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नेमणूक करण्यात आली आहे. सदर योजनेची संक्षिप्त टिप्पणी सोबत जोडली आहे. | सहायक कक्ष अधिकारी (गृनिधो-२) २२७९४१२४ (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (गृनिधो-२) २२७९४१२४ (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (गृनिधो-२) २२७९३०४२ (३ रा मजला मुख्य इमारत) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | (अ) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ मधील “कलम ४ (१)” नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने एखादी मिळकत गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केल्यामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस या न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल करता येईल.<br>(ब) महाराष्ट्र गलिच्छवस्ती (सु.नि.व.पु.) न्यायाधिकरण. | सहायक कक्ष अधिकारी (झोपनि-२) २२७९३८६२ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | कक्ष अधिकारी (झोपनि-२) २२७९३८६२ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | अवर सचिव (झोपनि-२) २२७९३७९४ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| ९. | धारावी विकास कार्यक्रम | सहायक कक्ष अधिकारी (झोपसू) २२७९४१२३ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | कक्ष अधिकारी (झोपसू) २२७९४१२३ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | अवर सचिव (झोपसू) २२७९३०४४ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) |
| १०. | बृहन्मुंबईतील झोपडपट्टी सुधार कार्यक्रमासंदर्भात मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचा समन्वय तसेच सक्षम प्राधिकारी व अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) यांचे कार्यालयाचे संनियंत्रण व प्रशासकीय/आस्थापना विषयक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (झोपनि-२) २२७९४१२३ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | कक्ष अधिकारी (झोपनि-२) २२७९४१२३ (दालन क्र.२५४, २ रा मजला विस्तार इमारत) | अवर सचिव (झोपनि-२) २२७९३७९४ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| ११. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयाशी संबंधित बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (झोपसु-१), २२७९ ३३०७ ( दालन क्रमांक २५४, विस्तार इमारत | कक्ष अधिकारी (झोपसु-१), २२७९ ३३०७ ( दालन क्रमांक २५४, विस्तार इमारत | अवर सचिव (झोपसु-१) २२७९ ३०४४ ( दालन क्रमांक २५४, विस्तार इमारत ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | संकीर्ण बाबी (इतर कार्यासनांना वाटून न दिलेल्या विभागातील अन्य सर्व बाबी.) | सहायक कक्ष अधिकारी (प्रशा-४) २२७९३१२८ (६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन.) | कक्ष अधिकारी (प्रशा-४) २२७९३१२८ (६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन.) | अवर सचिव (प्रशा-४) २२७९३७४६ (६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन.) |
| १३. | गृहनिर्माण विभाग, मंत्रालय (खुद्द) बाबत नोंदणीशाखा विषयक बाबी. | नोंदणीशाखा प्रमुख २२७९४१२१ (३ रा मजला मुख्य इमारत) | कक्ष अधिकारी (नोंदणीशाखा) २२७९३८६३ (३ रा मजला मुख्य इमारत) | अवर सचिव (नोंदणीशाखा) २२७९३७९४ (३ रा मजला मुख्य इमारत) |
| १४. | इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विषयक तसेच उपकराबाबतच्या धोरणात्मक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (दुवपु-१) २२७९३१२७ (६ वा मजला नवीन प्रशासकीय भवन) | कक्ष अधिकारी (दुवपु-१) २२७९३१२७ (६ वा मजला नवीन प्रशासकीय भवन) | अवर सचिव (दुवपु-१) २२७९३७४६ (३ रा मजला, मुख्य इमारत) |
| १५. | (अ) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, हस्तांतरण यांचे नियमन) अधिनियम, १९६३ (मोफा अधिनियम).<br>(ब) महाराष्ट्र अपार्टमेंट वेश्म मालकी अधिनियम, १९७० मधील धोरणात्मक बाबी. | सहायक कक्ष अधिकारी (दुवपु-२) २२७९३१२८ (६ वा मजला नवीन प्रशासकीय भवन) | कक्ष अधिकारी (दुवपु-२) २२७९३१२८ (६ वा मजला नवीन प्रशासकीय भवन) | अवर सचिव (दुवपु-२) २२७९३७४६ (३ रा मजला मुख्य इमारत) |

# गृहनिर्माण विभागातील दूरध्वनी क्रमांक

| अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यासन | दूरध्वनी क्रमांक | विस्तार क्रमांक |
|---|---|---|---|
| मा.उप मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे कार्यालय | | २२०२२४०१/<br>२२०२५०१४ | २२७९-३२७९ |
| श्रीमती वल्सा नायर सिंह, अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) | | २२८२१९६९ | -- |
| अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक | अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे कार्यालय | २२७९३४२५ | -- |
| श्री. सु.बा. तुंबारे, उप सचिव | झोपसू, झोपसू-१, झोपनि-२, प्रशा-१, नोंदणी शाखा, रोखशाखा | २२०४१३६५ | ३४६७ |
| श्री. अ.म.कवडे, उप सचिव | गृनिधो-१, गृनिधो २, अर्थ व लेखा, दुवपू-१, दुवपू-२, प्रशा-४, गृनिभू, गृनिप | २२०४८३७८ | ३८८० |
| श्री. प्र.ज्ञा.सदांशिव , अवर सचिव (विधि) | विधि संबंधात कामकाज (अतिरिक्त कार्यभार) | २२०४८३७८ | -- |
| श्री.अरविंद तु. शेटे, अवर सचिव | गृनिप, प्रशासन-१, नोंदणी शाखा, झोपनि-२ | २२०४८३७८ | ३७९४ |
| श्री.गोविंद कांबळे, अवर सचिव | दुवपु-१, दुवपु-२ व प्रशा-४ | २२०४८३८० | ३७४६ |
| श्री. दुर्गाप्रसाद मैलावरम, अवर सचिव | रोखशाखा, झोपसू, झोपसू-१ | २२०२४६४९ | ३०४४ |
| श्री.र.ना.खेतले, अवर सचिव | गृनिभू , गृनिधो-२ | -- | ३०४२ |
| श्री.र.ना.खेतले, अवर सचिव | अर्थ व लेखा, व गृनिधो-१ (अतिरिक्त कार्यभार) | -- | ३०४२ |
| श्री.प्र. द. तळेकर, कक्ष अधिकारी | झोपनि-२ | -- | ३८६२ |
| श्री. रा.गु.अंबाडेकर, कक्ष अधिकारी | प्रशासन-४ (अतिरिक्त कार्यभार) | -- | -- |
| श्री.ग. ध.दाभिळकर, कक्ष अधिकारी | दुवपु-२ | -- | ३१२८ |
| श्री. प्रविण कोळी, कक्ष अधिकारी | दुवपु-१ | -- | ३१२७ |
| श्री. रा.रा. देसाई, कक्ष अधिकारी | प्रशा-१, नोंदणी शाखा | -- | ३८६३ |
| श्री. मुं. उ. भरोसे, कक्ष अधिकारी | गृनिप | -- | ३६९६ |
| श्री. प्रविण कोळी, कक्ष अधिकारी | गृनिधो-१ (अतिरिक्त कार्यभार) | -- | ४१२२ |
| श्री. प्र. पु. राठोड, कक्ष अधिकारी | झोपसू-१ | -- | ३३०७ |
| श्रीमती अ .अ.लेंभे, कक्ष अधिकारी | गृनिभू | -- | ४१२० |
| श्रीमती अ .अ.लेंभे, कक्ष अधिकारी | अर्थ व लेखा (अतिरिक्त कार्यभार) | -- | ३०४१ |
| श्री.उ.ह. वाघमारे, कक्ष अधिकारी | झोपसू | -- | ४१२३ |
| श्री. रा.गु.अंबाडेकर, कक्ष अधिकारी | गृनिधो-२ | -- | ४१२४ |
| श्री. गिरिष सुर्वे, (स.क.अ.) सहायक प्रभारी नोंदणी शाखा प्रमुख | नोंदणी शाखा | -- | ४१२१ |
| श्री.गोपाल लोखंडे, (स.क.अ.) रोख लेखापाल | रोखशाखा | -- | ३०४३ |

# गृहनिर्माण विभागाअंतर्गत असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांचे पत्ते/ दूरध्वनी क्रमांक.

| अ. क्र. | लोकप्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखांचे पदनाम | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी | गृहनिर्माण भवन वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१ | ०२२- ६६४०५४०१ |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | मुख्य कार्यकारी अधिकारी | नविन प्राशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१ | ०२२-२६५९०५११<br>०२२-२६५६५८०० |
| ३. | अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) , मुंबई शहर. | अप्पर जिल्हाधिकारी | १ ला मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ | ०२२-२२६१००१३ |
| ४. | अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), मुंबई शहर (पूर्व उपनगरे). | अप्पर जिल्हाधिकारी | न्यु इंडस्ट्रीयल ॲश्युरन्स बिल्डींग , १ ला मजला, चर्चगेट समोर, मुंबई-४०० ०२०. | ०२२-२२८२०८१५<br>०२२-२२८२०८६६ |
| ५. | अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पश्चिम उपनगरे, मुंबई. | अप्पर जिल्हाधिकारी | प्रशासकीय इमारत , ७ वा मजला , गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई- ४०० ०५१. | ०२२-२६४३५४५७<br>०२२-२६४३९९३४ |
| ६. | अध्यक्ष, महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधार, निर्मूलन व पुनर्विकास न्यायाधिकरण). | अध्यक्ष | गृहनिर्माण भवन , वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१. | ०२२-६६४०५०१२ |
| ७. | सह व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित. | सह व्यवस्थापकीय संचालक | गृहनिर्माण भवन वांद्रे(पू.) मुंबई-४०० ००१. | ०२२-२६५९०५८८<br>०२२-२६५९१०८७ |
| ८. | अपील अधिकारी (म्हाडा) | अपील अधिकारी | गृहनिर्माण भवन वांद्रे(पू.) मुंबई-४०० ००१. | ०२२-६६४०५०१२ |
| ९. | सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई करिता(शासकीय वास्तु निष्कासन). | सक्षम प्राधिकारी | नवीन डी डी इमारत , ४ था मजला , जुने जकातघर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४००० ००१. | ९०२९०२८७८७ |
| १०. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर. | सक्षम प्राधिकारी | नागपूर जिल्हाधिकारी कार्याल्य, नागपूर | ०७१२-२९५५५८४ |
| ११. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे विभाग, पुणे. | सक्षम प्राधिकारी | गृहनिर्माण भवन, आगरकरनगर, पुणे | ०२०-२६१४५१५७ |
| १२. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई. | सक्षम प्राधिकारी | गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१. | ०२२-६६४०५३३६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नाशिक विभाग, नाशिक. | सक्षम प्राधिकारी | जुने महसूल आयुक्तालय, नाशिक रोड, नाशिक-४२२१०१. | २५३-२४६४०५१ |
| १४. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद. | सक्षम प्राधिकारी | इन्द्रप्रस्त इमारत निजाम बंगला छावणी परिसर, औरंगाबाद ४३१००२. | ८४४६९८९०९३ |
| १५. | सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, अमरावती विभाग, अमरावती. | सक्षम प्राधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रणकक्ष कॅम्परोड, अमरावती ४४४६०२. | ९४२२०२१३४२ |
| १६. | महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण. | अध्यक्ष | हाफकीन भवन, प्लॉट नं. सी-२१, ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्पेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. | ०२२-६८१११६०० |
| १७. | महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण. | अध्यक्ष | पहिला मजला, वन फोब्ज बिल्डींग, थापर हाऊस, डॉ.व्ही.बी.गांधी रोड, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-४०० ००१. | ०२२-२२७१०२०० |

गृहनिर्माण विभाग

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गत असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांचे पत्ते/ दूरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | लोकप्राधिकारी संस्था | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. | गृहनिर्माण भवन वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१. | ०२२- ६६४०५४०१ |
| २. | सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. | गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई- ४०००५१. | ०२२-६६४०५४५५ |
| ३. | मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई- ४००० ५१. | ६६४०५३९७, ६६४०५३९८ |
| ४. | मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ. | तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई- ४००० ५१. | ६६४०५३८८ |
| ५. | मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई. | गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. | ०२२ ६६४०५३६६ |
| ६. | मुख्य अधिकारी, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई- ४००० ५१. | २६५९१५०२/५०११ |
| ७ | मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | आगरकर नगर, अलंकार सिनेमाच्या मागे, पुणे-४११ ०५१ | ०२०-२६१२८८५६ |
| ८. | मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, राजस्व भवन समोर,नाशिक -४२२००२. | ०२५३२२२९२०२ |
| ९. | मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | गृहनिर्माण भवन, टेम्पल रोड, सिव्हील लाईन्स नागपूर- ४४०००२. | ०७१२२५६२२३९ / ०६४९ |
| १०. | मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | महावीर स्तंभाजवळ, औरंगाबाद ४३१००१. | ०२४०-२३३५०६१ |
| ११. | मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ. | गृहनिर्माण भवन ,मालटेकडी रोड, अमरावती - ४४४ ६०२. | ०७२१-२९९००६३, २६६२८८७ |

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत असलेल्या मुंबई येथील कार्यालयांचे पत्ते/ दूरध्वनी क्रमांक.

## १) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई :-

| अ.क्र | पदनाम | दुरध्वनी क्रमांक व पत्ता | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | | बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र. |
| २ | सक्षम प्राधिकारी- १ | | मुंबई शहर जिल्ह्यातील - कुलाबा, फोर्ट, भुलेश्वर, मांडवी, गिरगाव, भायखळा, मलबार-कंबाला हिल, माझगांव, परळ-शिवडी, ताडदेव, वरळी, लोअर परेल, प्रिन्सेस डॉक, दादर-नायगांव, माटुंगा, माहिम, सॉल्ट पॅन, शीव, धारावी. |
| ३ | सक्षम प्राधिकारी-२ | | मुंबई उपनगर जिल्ह्याच्या अंधेरी तालुक्यातील - वांद्रे, दांडा, जुहू, परिघखाडी. |
| ४ | सक्षम प्राधिकारी-३ | नविन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१ | मुंबई उपनगर जिल्ह्याच्या अंधेरी तालुक्यातील - विले-पार्ले, कोले-कल्याण, ब्राम्हणवाडा, सहार, चकाला, इस्मालिया, अंधेरी, आंबिवली, वर्सोवा. |
| ५ | सक्षम प्राधिकारी-४ | | मुंबई उपनगर जिल्ह्याच्या अंधेरी तालुक्यातील - मुळगांव, मजास, परजापुर, मरोळ, गुंदवली, कोंडीविटा, बापनाला, व्यारवली, ओशिवरा, बांदिवली, मढ, मोगरा. |
| ६ | सक्षम प्राधिकारी-५ | | मुंबई उपनगर जिल्ह्याच्या बोरीवली तालुक्यातील - मालाड, कुरार, मनोरी, एरंगळ, मालवणी, मार्वे, दारवली, आक्से. |
| ७ | सक्षम प्राधिकारी-६ | | मुंबई उपनगर जिल्ह्याच्या बोरीवली तालुक्यातील- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पहाडी गोरेगाव, गोरेगाव, पहाडी एकसर, दिंडोशी, चिंचवली, आरे, मरोळ-मरोशी, तुळशी, साई, क्लेराबाद, गुंदगाव, वळणई, पोयसर, आकुर्ली. |
| ८ | सक्षम प्राधिकारी-७ | | **मुंबई उपनगर जिल्ह्याच्या बोरीवली तालुक्यातील-** कांदिवली,चारकोप, वाढवण, शिंपोली, बोरिवली, गोराई, कन्हेरी, दहिसर, एकसर, मंडपेश्वर, मागाठाणे. |
| ९ | सक्षम प्राधिकारी-८ | | **मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कुर्ला तालुक्यातील-** मुलुंड, नाहूर, भांडूप, कांजूर, हरियाली, विक्रोळी, घाटकोपर, तुंगवा, पवई, पासपोली, चांदिवली, कोपरी, तिरंदाज, घाटकोपर-किरोळ, साकी. |
| १० | सक्षम प्राधिकारी-९ | | **मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कुर्ला तालुक्यातील-** असल्फा, किरोळ, मोहिली, कुर्ला भाग- १,२,३,४ |
| ११ | सक्षम प्राधिकारी-१० | | **मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कुर्ला तालुक्यातील-** चेंबूर, माहूल, आणिक, वाढवली, मारवली, ननाले, मानबुद्रुक, तुर्भे, मानखुर्द, मंडाला, देवनार,बोर्ला. |



गृहनिर्माण विभाग

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत असलेल्या MMR SRA ठाणे मधील कार्यालयांचे पत्ते/ दूरध्वनी क्रमांक.

## १) मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, MMR-SRA ठाणे :-

| अ.क्र | पदनाम | दुरध्वनी क्रमांक व पत्ता | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | ०२०२५५७७९०१<br>मुंबई महानगरप्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता),ठाणे महानगरपालिका मंडई इमारत,डॉ.काशिनाथ घाणेकर नाटयगृहाजवळ,खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता,मानपाडा,ठाणे (पश्चिम),पिन- ४०० ६१०. | मुंबई महानगरप्रदेश क्षेत्र |
| २ | सक्षम प्राधिकारी- १ | | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्रमांक 1, 2, 3 व नवी मुंबई |
| ३ | सक्षम प्राधिकारी-२ | | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्रमांक 4, 5, 6, 7 व मिरा-भाईंदर |
| ४ | सक्षम प्राधिकारी-३ | | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्रमांक 8, 9, 10, 11 व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| ५ | सक्षम प्राधिकारी-४ | | वसई-विरार महानगरपालिका ,पालघर नगरपरिषद व बोईसर ग्रामपंचायत |
| ६ | सक्षम प्राधिकारी-५ | | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका |
| ७ | सक्षम प्राधिकारी-६ | | उल्हासनगर महानगरपालिका |
| ८ | सक्षम प्राधिकारी-७ | | अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषदा |
| ९ | सक्षम प्राधिकारी-८ | | पनवेल महानगरपालिका व पेण, अलिबाग, खोपोली, कर्जत व माथेरान नगरपरिषदा |

## २) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे :-

| अ.क्र | पदनाम | दुरध्वनी क्रमांक व पत्ता | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | ०२०२५५७७९०१<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुख्य कार्यालय : चौथा मजला,काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर, शिवाजी नगर,पुणे - ४११ ०१६ | पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र |
| २ | उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी- १ | | वॉर्डनिहाय क्षेत्र |
| ३ | उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-२ | | घोले रोड- क्षेत्रिय कार्यालय,<br>कोथरुड - बावधान क्षेत्रिय कार्यालय,<br>औंध- बाणेर क्षेत्रिय कार्यालय,<br>येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय,<br>वार्जे-कर्वे नगर क्षेत्रिय कार्यालय,<br>संगमवाडी- क्षेत्रिय कार्यालय |
| ४ | उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-३ | | ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय,<br>नगर रोड क्षेत्रिय कार्यालय,<br>कसबा विश्रामबाग क्षेत्रिय कार्यालय,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र |

## ३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, धारावी :-

| अ.क्र | पदनाम | दुरध्वनी क्रमांक व पत्ता | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी , | ०२२-२६५९२८७५<br>धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.),मुंबई-४०० ०५१ | धारावी पुनर्विकास क्षेत्र |
| २ | उप जिल्हाधिकारी सक्षम प्राधिकारी- १ | | धारावी, सेक्टर-५ |
| ३ | उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-२ | | क्षेत्र वाटप केलेले नाही |

## ४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर :-

| अ.क्र | पदनाम | दुरध्वनी क्रमांक व पत्ता | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | ९८६०१०५७९१<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,<br>नागपूर पालिका इमारत,सिव्हील लाईन्स,<br>नागपूर - ४४० ००१ | नागपूर महानगरपालिका क्षेत्र |

# गृहनिर्माण विभाग (खुद्द) मधील कार्यासनांत हाताळण्यात येणाऱ्या विषयांची कार्यासननिहाय थोडक्यात माहिती/तपशिल

गृहनिर्माण विभाग

**<u>गृनिभू</u>**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम १६ अंतर्गत दि.२२.११.२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतुदीनुसार विनियम १६ अंतर्गत भुखंडाचे वितरण आता थेट करता येत नाही. त्यासाठी अशा भुखंडाची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन अर्ज मागविणे, अर्जाची म्हाडाकडून छाननी करणे, शासनास प्रस्ताव सादर करणे व मंत्रिमंडळ उपसमितीने गुणवत्तेनुसार निर्णय घेणे इत्यादी प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. (मुंबई मंडळ वगळून).

महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम-१९८१ चे विनियम १३ (२) अन्वये खालील गटांसाठी गृहनिर्माण योजनेकरिता शासनाची मान्यता दिली जाते.

(१) ) मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व इतर कनिष्ठ न्यायालयात कार्यरत असलेले न्यायाधीश,

(२) आजी/माजी विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभा सदस्य

(३) पत्रकार

(४) कायम आस्थापनेवर असलेले राज्य व केंद्र शासनाचे अधिकारी / कर्मचारी

(५) राज्य शासनास योग्य वाटेल असा इतर कोणताही विशेष प्रवर्ग

- या योजनेंतर्गत कोणत्याही विशिष्ट गटासाठी जाहिराती न देता सदनिकांचे वितरण करता येत नाही.

दि. २५.०४.२०११ च्या शासन निर्णयान्वये जाहिरात देणे, नोटीस प्रसिध्द करणे, अर्ज मागविणे, त्यांची छाननी करणे व आवश्यकता असल्यास सोडत काढणे ही प्रक्रिया राबविणे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास प्राप्त जमिनीचे भूसंपादन रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे. (मुंबई मंडळ वगळून)

## <u>गृनिप</u>

### <u>मुंबईतील गिरणी कामगार :-</u>

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील सुधारीत विनियम ५८ (१) (ब) (बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली-२०३४ च्या विनियम ३५) अनुसार मुंबईतील ५८ बंद/अजारी कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप साधरणत: १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, १/३ म्हाडा व १/३ गिरणी मालक यांना देण्याची तरतूद आहे. म्हाडास उपलब्ध होणा-या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी २/३ गाळे व संक्रमण सदनिकांसाठी १/३ गाळे बांधण्याची तरतूद आहे. म्हाडास ताबा प्राप्त झालेल्या गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी / वारसांसाठी बांधण्यात आलेल्या एकूण १५८७० सदनिकांची सोडत म्हाडाकडून काढण्यात आलेली आहे.

### १) <u>म्हाडाच्या ५६ वसाहती :-</u>

बृहन्मुंबईमध्ये म्हाडाच्या ५६ वसाहती असून त्यामध्ये ११४ अभिन्यास आहेत. सदरहू वसाहतीतील इमारती ५०-६० वर्षापुर्वीच्या असल्याने त्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या आहेत. सदरहू वसाहतींचा विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम ३३(५) मधील तरतुदीनुसार करण्यात येतो. विनियम ३३ (५) मध्ये नगर विकास विभागाकडून वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सुधारित विनियम ३३(५) नुसार ४००० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या भूखंडाच्या पुनर्विकासाकरीता ३.०० च.क्षे.नि. चे वितरण अधिमूल्य आकारुन अथवा गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर मंजूरी देण्याचे धोरण दि.१३/११/२०१८ च्या अधिसूचनेनुसार निश्चित करण्यात आलेले आहे.

### २) <u>मुंबई विकास विभाग चाळी (B.D.D.चाळी) :-</u>

सन १९२१-१९२५ दरम्यान मुंबईतील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधण्यात आल्या असून, प्रत्येक चाळ ही तळ + ३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी ८० रहिवाशी गाळे आहेत. त्यानुसार सदरहू बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये जवळपास



गृहनिर्माण विभाग

१५,५८४ भाडेकरुंचे पुनर्वसन करण्याचे नियोजन आहे. सदरहू चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी म्हाडास सुकाणू अभिकरण व नियोजन प्राधिकरण म्हणून नेमले आहे. तसेच सदरहू पुनर्वसन प्रकल्पाबाबत म्हाडास मार्गदर्शन करण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती आणि मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आलेली आहे.

### ३) सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई :-

मुंबई शासकीय वास्तु (निष्कासन) अधिनियम १९५५ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांची नियुक्ती या विभागामार्फत केली जाते. सदरहू कार्यालयाकडून बृहन्मुंबईमधील राज्य शासकीय वास्तुमध्ये अनधिकृत / बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित / काढून टाकण्याची कार्यवाही केली जाते. सक्षम प्राधिकारी (बृहन्मुंबई) यांचे कार्यालय (Quasi Judicsal Fourum) दर्जाचे असल्याने शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम १० या कार्यालयास लागू नाही.

<u>गृनिधो-१</u>

- महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या बाबी, भाडे नियंत्रण कायदाअंतर्गत सक्षम अधिकारी यांच्या नेमणूका करणे, महाराष्ट्र राज्यातील कोकण/ पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर विभागातील भाडे नियंत्रण कायदा न्यायालय कार्यालयाचे पर्यवेक्षण व सदरहू कार्यालयात उद्भवणाऱ्या अडीअडचणींचे निराकरण करणे, नवीन चंद्रपूर शहर योजनेच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

- **कार्यासनाच्या अखत्यारीत येणारे मंडळ:-** महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्यातील कोकण/ पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर विभागातील भाडे नियंत्रण कायदा न्यायालय कार्यालय.

**सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालयांची कार्ये**

- महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या प्रकरणांची सुनावणी घेऊन कार्यवाही करणे.

********

## प्रधानमंत्री आवास योजना (नागरी)

➢ "सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे" हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) जून, २०१५ मध्ये सुरु केली आहे.

➢ शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक ०९.१२.२०१५ अन्वये प्रधानमंत्री आवास योजना राज्यात राबविण्यात येत आहे.

➢ सद्यस्थितीत राज्यातील ३९७ शहरांत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

➢ सदर योजनेसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांना सुकाणू अभिकरण व अभियान संचालनालय म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

➢ प्रधानमंत्री आवास योजनेचे संनियंत्रण गृहनिर्माण विभागाकडून करण्यात येते. तर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी संबंधित स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येते.

➢ प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जी व्यक्ती आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) किंवा मध्यम उत्पन्न गटात (MIG) मोडते व तीचे संपूर्ण देशात कुठेही पक्के घर नाही,अशी व्यक्ती सदर योजनेंतर्गत लाभास पात्र ठरते.

➢ सदर योजनेमध्ये खालील चार घटक समाविष्ट आहेत:

१. जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्टयांचा “आहे तेथेच" पुनर्विकास करणे. (ISSR)

२.कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. (CLSS).

३.खाजगी भागीदारीव्दारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. (AHP-PPP)

४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान. (BLC)

➢ सदर घटकांपैकी घटक क्र.१,३ व ४ हे राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असून घटक क्र. २ हा १००% केंद्र पुरस्कृत घटक म्हणून NHB , HUDCO व SBI यांच्या मार्फत दिनांक ३१ मार्च

२०२२ पर्यंत राबविण्यात येत होता. सदरहू योजनेतील घटक क्र.२ ची मुदत दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आली आहे.

➢ घटक क्र. १ साठी केंद्र व राज्य सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रुपये १.० लक्ष इतके असून घटक क्र. ३ व ४ साठी केंद्र सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रुपये १.५ लक्ष इतके तर राज्य शासनाचे अनुदान प्रती लाभार्थी रुपये १.० लक्ष इतके आहे.

➢ घटक क्र. २ साठी विवक्षित बँका / गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था यांच्याकडून रुपये ६.० लक्ष पर्यंत ६.५ % दराने १५ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. रुपये ६.० लक्ष वरील कर्ज व्याजदर अनुदान विरहित असते.

*****************************************************************************************************

गृहनिर्माण विभाग

दुवपू-१

- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या इमारत पुर्नबांधणी प्रकरणांच्या अनुषंगाने धोरणात्मक बाबी, म्हाडा अधिनियम १९७६ मधील प्रकरण ८ खालील भूंसपादनांची प्रकरणे, म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम १०३-ब अन्वये भूसंपादित केलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासांची प्रकरणे, म्हाडा अधिनियम १९७६ मधील कलम ८२, ८३ व ८४ अन्वये उपकरातून सुट देणे व उपकर लागू करणे, उपकर प्राप्त मालमत्ता धारक / रहिवाशी यांस मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याविषयाच्या बाबी, उपकर प्राप्त इमारतींमधील भाडेकरु / रहिवाशांच्या पात्रतेविषयक बाबी, रहिवाशांच्या पात्रतेच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या प्रथम अपिल निर्णयावर अर्जदारांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांवर प्रधान सचिव यांचेकडे सुनावणी, उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे.
- **कार्यासनाच्या अखत्यारीत येणारे मंडळ:-**
- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१.
- **मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची कार्ये**
  - मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती एकुण १९६४२ पैकी सद्य:स्थिती अस्तित्वात असलेल्या १३०९१ इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्रचना.
  - नियमित सर्वेक्षण, पावसाळा पुर्व सर्वेक्षण अतिधोकादायक इमारतींची घोषणा
  - संक्रमण शिबीरांची व्यवस्था.
  - पुनर्रचित इमारती व संक्रमण शिबीरांची देखभाल व दुरुस्ती.
  - विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ विनियम ३३(६), ३३(७) व ३३(९) अंतर्गत पुनर्विकासाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे व भाडेकरु / रहिवाशांची पात्रता निश्चित करणे.

दुवपु-२

## महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण

केंद्र शासनाचा स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा, २०१६ (रेरा) दि.२५.०३.२०१६ रोजी देशभरात लागू कारण्यात आला. याच्या अंमलबजावणीसाठी "महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण" (Maharashtra Real Estate Regulatory Authority) (महारेरा) स्थापन करण्यासाठी दिनांक ०८ मार्च २०१७ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. दि.१ मे २०१७ पासून महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची (महारेरा) स्थापना करण्यात आली आहे.

महारेरा हे महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्राचे नियमन करीत आहे. ग्राहकांचे हित व जलद विवाद निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन केल्याने बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता व कार्यक्षमता आली आहे. खुल्या बाजारात सदनिका विक्री करण्यापूर्वी प्रत्येक विकासकाला त्याचे प्रस्तावित आणि चालू असलेले दोन्ही प्रकल्प महारेरामध्ये नोंदणीकृत करणे बंधनकारक आहे. महारेराच्या तरतुदींचे पालन न केल्यास कठोर दंड आणि शिक्षेची तरतूद आहे.

सदर संस्थेचा प्रमुख अध्यक्ष असून या संस्थेचे कार्यालय हाफकीन भवन, प्लॅाट नं. सी-२१, ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्पेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ या ठिकाणी आहे. (दुरध्वनी क्र. ०२२-६८१११६००)

*************

## महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) या कार्यालयाने दिलेल्या निर्णय, निर्देश किंवा आदेश तक्रारदारास मान्य नसल्यास त्या निर्णय, निर्देश किंवा आदेशाविरुद्ध न्यायाधिकरणात अपील करण्यात येते.

दि.२४.१२.२०१८ रोजी महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयाची सुरुवात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण कार्यालयाने दिलेला निर्णय, निर्देश किंवा आदेश तक्रारदार व्यक्तीस किंवा संस्थेस मान्य नसल्यास मा. उच्च न्यायालय , मुंबई यांच्याकडे दाद मागता येऊ शकते.

सदर संस्थेचा प्रमुख अध्यक्ष असून या संस्थेचे कार्यालय , पहिला मजला, वन फोब्ज बिल्डींग, थापर हाऊस, डॉ.व्ही.बी.गांधी रोड, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-४०० ००१ या ठिकाणी आहे. (दुरध्वनी क्र. ०२२-२२७१०२००)

*************

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई, क्र. झोपुयो-१०९५/प्र.क्र.३७/गृ.नि.सेल, दि. १६.१२.१९९५ अन्वये झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (१९७१ चा महाराष्ट्र २८) अन्वये महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबईतील झोपडपट्यांकरीता झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

मुंबई शहर व उपनगरांमधील झोपडपट्यांच्या पुनर्वसन योजनांवर नियंत्रण ठेवणे, योजनांना गती देणे तसेच झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी पुरक अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये विविध तरतुदींचा अंतर्भाव करणे इत्यादी बाबत कामकाज करण्यात येते.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३Z (६) अन्वये केंद्र शासनाच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे अधिकार राज्याला नाहीत. तथापि, केंद्र शासनाच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवावयाची असल्यास त्याकरिता केंद्र शासनाच्या परवानगीची आवश्यकता असते. सबब, मुंबई शहर व उपनगरातील केंद्र शासनाच्या जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करणे, त्याकरिता केंद्र शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळविणे, झोपडपट्टयांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे व केंद्रशासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे इत्यादी कामकाज करण्यात येते.

मुंबई शहर व उपनगरामधील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाकरिता झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना उद्भवणारी विविध न्यायालयीन प्रकरणे हाताळली जातात.

मुंबई शहर व उपनगरामधील झोपडपट्टयांच्या पुनर्वसन योजनांबाबत झोपडीधारकामार्फत किंवा विकासकामार्फत किंवा लोकप्रतिनिधीमार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करणे तसेच सदर तक्रारीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कार्यवाही करण्याबाबत नोटीस देणे इत्यादी कामकाज करण्यात येते.

**झोपसु**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे**

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झोपुयो-२००४/प्र.क्र.२१३/ झोपडपट्टी -१, दिनांक ३० जून, २००५ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३अ नुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

नगर विकास विभागाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये निर्देश देऊन दिनांक ११ डिसेंबर, २००८ रोजी विशेष नियमावली अंमलात आणलेली आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम ३७ (१)(ब) अन्वये निर्देश देऊन दि. ११/०९/२०१४ रोजी प्राधिकरणाची सुधारीत नियमावली अंमलात आणलेली आहे. या दोन्ही नियमावलीतील तरतूदीनुसार तसेच पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसनाचे कामकाज करण्यात येते.

**मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**

दि. ०८ सप्टेंबर, २०२० च्या अधिसूचनेन्वये ८ महानगरपालिका (नवी मुंबई महानगरपालिका (सिडको आणि नैना क्षेत्रासह), ठाणे, पनवेल,कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, उल्हासनगर) व ७ नगरपरिषदेचा (अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान आणि कर्जत) समावेश असलेले मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) नियुक्त करण्यात आले आहे. तसेच दि. २३ मार्च, २०२२ च्या अधिसूचनेद्वारे त्यामध्ये पालघर नगरपरिषद व बोईसर ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका क्षेत्राच्या व नगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक रचना अधिनियम, १९६६ च्या ३७ (१-बी) अन्वये नवनिर्मित मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकरिता १०६ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर

शासन अधिसूचना दि. २४.०८.२००४ अन्वये नागपूर शहराचा समावेश असलेल्या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनवर्सन योजनेच्या अंमलबजावणीसाठी झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, नागपूर कार्यालयाची स्थापना करण्यात आली.

धारावी पुनर्विकास प्रकल्प

शासन निर्णय ०४ फेब्रुवारी, २००४ अन्वये धारावीचा एकत्रित विकास सर्वकष पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला. दि. २४.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये सचिव समितीची पुनर्रचना करण्यात आली. दि. ११.०९.२००७ च्या शासन निर्णयान्वये धारावी पुनर्विकास प्रकल्पास अत्यावश्यक नागरी प्रकल्प म्हणुन घोषित करण्यात आला. दि.१६.१०.२०१८ रोजी मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार गृहनिर्माण विभाग शासन निर्णय दि. ०५.११.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला. त्यानुसार SPV ची स्थापना करण्यात आली.दि. २८.११.२०१८ रोजी ई-निविदा मागविण्यात आल्या. दि.२९ ऑक्टोबर,२०२० रोजी मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि. ०५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सध्या सुरू असलेली धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. धारावी पुनर्विकास प्रकल्पाची विशेष हेतु कंपनी मॉडेलच्या अंतर्गत सुधारित जागतिक विविदा प्रक्रियेद्वारे व रेल्वे जमीन विकास प्राधिकरणामार्फत रेल्वेच्या जमिनाच्या हस्तांतरणासाठी उललेख केलेल्या अटी व शर्तीसह पुन्हा नव्याने निविदा मागवून तसेच प्रकल्पाला अतिरिक्त सवलती देऊन अंमलबजावणी करणेबाबत. मा. मंत्रिमंडळाने दि.२१.०९.२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. उपरोक्त विषयाबाबत प्रकल्पाला अतिरिक्त सवलती देवून पुन्हा नव्याने विविदा मागविण्यासाठी दि. २३.०९.२०२२ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****



गृहनिर्माण विभाग

अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) व सक्षम प्राधिकारी कार्यालये :-

मुंबई शहर व मुंबई उपनगर क्षेत्रातील शासकीय गलिच्छ वस्ती घोषित जमिनीवर अतिक्रमणे होऊ नयेत याकरिता अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पूर्व उपनगरे व अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पश्चिम उपनगरे तसेच संबंधित सक्षम प्राधिकारी या कार्यालयांद्वारे कार्यवाही करण्यात येते. तसेच सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत झोपडीधारकांची पात्र/अपात्रता निश्चित करणे, अपात्र झोपडीधारकांच्या निष्कासनाची कार्यवाही करणे, परिशिष्ट-२ अंतिम करणे, सर्व्हेक्षण करणे, गलिच्छ वस्ती घोषित करणे इ. कामे करण्यात येतात.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडा) :-

मुंबई शहर व उपनगर जिल्हयात विशेषत्वाने झोपडपट्टी भागात मुलभूत व पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येतात. यासाठी म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातर्फे रस्ते, पायवाटा, पाण्याचे नळ, दिवाबत्ती, सार्वजनिक शौचालय,गटारे इत्यादी मुलभुत सुविधा तसेच झोपडपट्टी भागात राहणा-या लोकांचे जीवनमान उंचवण्यासाठी मुलभुत सुविधांसोबत समाजमंदीर, समाज कल्याण केंद्र, वाचनालये, खुले सभागृह/ व्यासपीठ इत्यादी सामाजिक सुविधा पुरविण्यात येतात. तसेच संरक्षक भिंत योजना, डोंगर उतारावरील झोपड्यांच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंतीचे बांधकाम सुधार मंडळामार्फत करण्यात येते.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सु. नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १४ (१) अन्वये कार्यवाही :-

झोपडपट्टी व्याप्त खाजगी जमिनीवरील झोपडीधारकांना वर्षानुवर्षे जमीन मालकांकडून सदरहू ठिकाणी मुलभूत सुविधा पुरविल्या जात नसल्याने तसेच झोपडीधारकांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १४ (१) अन्वये शासनाद्वारे सदरहू जमिनीचे भूसंपादन करण्यात येते.

*************



गृहनिर्माण विभाग